# अपंगांबद्दल असंवेदनशील दृष्टिकोन बाळगू नका!

## उच्च न्यायालयाचे 'एमपीएससी'ला खडेबोल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** अपंग किंवा दृष्टिहीन व्यक्तींबद्दल असंवेदनशील दृष्टिकोन बाळगू नका, त्यांच्याबद्दल संवेदनशील आणि समावेशक दृष्टिकोन स्वीकारा, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. तसेच, गुजरातस्थित पूर्णतः दृष्टिहीन असलेल्या महिलेला 'एमपीएससी'अंतर्गत लिपिक-टंकलेखक पदासाठीच्या तिच्या नोकरीच्या पसंती अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्यास परवानगी दिली.

'आयोगाचा याचिकाकर्तीच्या प्रती असलेला दृष्टिकोन हा अपंग व्यक्तींबद्दल असंवेदनशीलता दर्शवितो. तिच्या अर्जातील चूक दुरुस्त करता येणार नाही किंवा चूक दुरुस्त केल्यास कोणावरही अन्याय होईल, अशी परिस्थिती नाही,' अशी टिप्पणीही न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आणि न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्तीला दिलासा देताना केली.

### प्रकरण काय?

पूर्णतः अंधत्व असल्याने पिंजारी यांनी अर्ज भरण्यासाठी बाह्य मदत घेतली होती आणि अर्ज भरतेवेळी नोकरीच्या जागेसाठी कोणतेही प्राधान्य नसल्याचा पर्याय चुकून निवडला गेला. त्यानंतर, याचिकाकर्तीने चूक दुरुस्तीची मागणी केली. तथापि, अर्ज भरल्यानंतर त्यात बदल करण्याची परवानगी नसल्याची सबब पुढे करून आयोगाने मागणी फेटाळली. त्यामुळे, याचिकाकर्तीने या निर्णयाला वकील उदय वारुंजीकर यांच्यामार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

अहमदाबाद येथील रहिवासी असलेल्या शबाना पिंजारी यांनी 'गट-क' सेवा भरती प्रक्रियेअंतर्गत प्राथमिक आणि मुख्य दोन्ही परीक्षा १९२.४८ गुण मिळवून उत्तीर्ण केल्या होत्या. कामगिरी उत्तम असूनही केवळ सहाय्यकाच्या मदतीने अर्ज भरताना अनावधानाने झालेल्या चुकीमुळे त्यांना नोकरीसाठी पसंतीचा विभाग निवडण्याची संधी नाकारण्यात आली.

# लोढा बंधुंमधील वाद संपुष्टात

## माजी न्यायमूर्ती रवींद्रन यांची मध्यस्थी; नाव वापरण्याबाबत सहमती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** पाच हजार कोटी रुपयांच्या मालमत्तेच्या मालकीचे 'लोढा' हे नाव वापरण्यावरून अभिषेक आणि अभिनंदन या लोढा बंधुंमध्ये सुरू झालेला वाद अखेर मिटला आहे. माजी न्यायमूर्ती आर. व्ही. रवींद्रन यांनी यामध्ये यशस्वी मध्यस्थी केली. हा वाद सौहार्दपूर्ण मार्गाने सोडवण्याचा सल्ला उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या एकलपीठाने लोढा बंधुंना दिला होता. तो दोन्ही भावांनी मान्य केला.

न्यायालयाने दोघांमधील वाद मिटवण्यासाठी माजी न्यायमूर्ती रवींद्रन यांची मध्यस्थी म्हणून नियुक्ती केली होती. या वादावर तोडगा काढण्यात आल्याचे लोढा बंधुंनी सोमवारी एका अधिकृत निवेदनाद्वारे स्पष्ट केले. लोढा हे नाव वापरण्याबाबत दोन्ही बंधुंमध्ये सहमती झाल्याचेही या निवेदनात म्हटले आहे.

दोन्ही भावांमध्ये झालेल्या तडजोडीनुसार, थोरले बंधू अभिषेक लोढा यांची 'मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड' (एमडीएल) ही कंपनी 'लोढा ॲण्ड लोढा ग्रुप' या व्यापारचिन्हाचे मालक असतील आणि त्यांना हे नाव वापरण्याचा विशेषाधिकार असेल. तर धाकटे बंधू अभिनंदन लोढा 'हाऊस ऑफ अभिनंदन लोढा' (एचओएबीएल) या व्यापारचिन्हाचे मालक असतील आणि त्यांना हे नाव वापरण्याचा विशेषाधिकार असेल. याशिवाय, लोढा ग्रुप आणि हाऊस ऑफ अभिनंदन लोढा या दोन्ही कंपन्यांचा एकमेकांशी कोणताही संबंध असणार नाही आणि दोन्ही कंपन्यांमध्ये त्याबाबत विस्तृत समन्वय साधला जाईल.

अभिनंदन लोढा यांना लोढा ग्रुप किंवा एमडीएल किंवा अभिषेक लोढा यांच्या इतर व्यवसायांमध्ये कोणताही अधिकार असणार नाही किंवा ते त्यावर दावाही सांगणार नाहीत. हीच बाब अभिषेक यांना अभिनंदन यांच्या मालकीच्या कंपन्या आणि इतर व्यवसायांबाबत लागू होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वादावर तोडगा निघाल्यानंतर भाजप नेते आणि राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे पुत्र अभिषेक आणि अभिनंदन लोढा यांनी मध्यस्थी प्रक्रियेत मार्गदर्शन केल्याबद्दल उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डॉक्टर आणि वादावर तोडगा काढण्यात यशस्वी ठरलेले माजी न्यायमूर्ती रवींद्रन यांचे आभार मानले.



### दोघांमधील वाद काय ?

- अभिषेक लोढा यांच्या 'मॅक्रोटेक डेव्हलपर्स लिमिटेड'ने काही दिवसांपूर्वी अभिनंदन यांच्या 'हाऊस ऑफ अभिनंदन लोढा' या कंपनीविरोधात उच्च न्यायालयात धाव घेऊन दावा दाखल केला होता. त्यात, 'लोढा' या व्यापारचिन्हाचे स्वामित्त्वहक्क आपल्याकडे असून इतर कोणीही ते वापरू शकत नाही. त्यामुळे, 'लोढा' हे व्यापारचिन्ह वापरण्यापासून अभिनंदन आणि त्यांच्या कंपनीला कायमची मनाई करण्याची मागणी अभिषेक यांनी केली होती.
- प्रकरणाच्या पहिल्याच सुनावणीच्या वेळी, हा वाद दोन भावांमधील असल्याचे दिसते, असे न्यायमूर्ती डॉक्टर यांच्या एकलपीठाने म्हटले होते. तसेच, 'लोढा' या नावावरून सुरू असलेला वाद दोन बंधु मध्यस्थांमार्फत सोडवण्यास तयार आहेत का ? अशी विचारणा केली होती. त्याला दोन्ही लोढा बंधुंनी सहमती दाखवली होती.

# जुहू येथे वृद्धाची हत्या

**मुंबई :** जुहू येथे ५५ वर्षीय वृद्धाची हत्या करण्यात आली. नेहमीच्या वादातून आरोपीने त्याच्या डोक्यात लाकूड मारून जीव घेतला. याप्रकरणी जुहू पोलिसांनी आरोपीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.

जुहू सेंट जोसेफ चर्चजवळ रविवारी हा प्रकार घडला. बब्बू मेहतर (५५) असे मृत व्यक्तीचे नाव असून, ते त्याच परिसरातील पदपथावर राहात होते. त्यांच्या शेजारी पदपथावर झोपणाऱ्या मुन्ना गुप्ता याने रागातून रविवारी बब्बूच्या डोक्यात लाकूड मारले. पोलिसांनी बब्बू मेहतरला कुपर रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.




# आंदोलक रहिवाशांची आज अधिकाऱ्यांबरोबर बैठक

## ठाणे-बोरीवली भुयारी मार्गप्रकरणी अहवाल सादर होण्याची शक्यता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**ठाणे :** राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाला विरोध करत स्थानिक रहिवाशांनी दोन दिवसांपूर्वी आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर ठाणे पोलिसांनी मध्यस्थी करत एमएमआरडीए अधिकारी आणि रहिवाशांची मंगळवारी सायंकाळी एक बैठक आयोजित केली असून, यामध्ये रस्ते मार्गाऐवजी मुल्लाबाग ते युनी अबेक्स कंपनीपर्यंत भुयारी मार्ग नेण्याबाबत चर्चा होणार आहे.

याशिवाय, यासंबंधी मुंबई आयआयटीने पाहाणी करून केलेल्या अभ्यासाचा अहवालही अधिकाऱ्यांकडून सादर होण्याची शक्यता आहे. या बैठकीला एमएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अभियंता विशाल जांभळे हे उपस्थित राहणार आहेत. या वृत्तास स्थानिक रहिवासी नितीन सिंग, डॉ. लतिका भानुशाली यांनी दुजोरा दिला आहे.

मानपाडालगतचा मुल्लाबाग परिसर निसर्गाने नटलेला आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामुळे येथे मोठा हरित पट्टा आहे. या परिसरात एमएमआरडीएमार्फत ठाणे-बोरीवली भुयारी मार्गाचे काम सुरू आहे. त्यासाठी येथील जुन्या वृक्षांवर कुऱ्हाड चालवून हरित पट्टा नष्ट करण्यात आला आहे. त्याचबरोबर भुयारी मार्गाच्या खोदकामादरम्यान निघणाऱ्या मातीची दररोज शेकडो डम्परद्वारे वाहतूक होत असून, यामुळे येथे वाहतूक कोंडी होते. तसेच, माती वाहतुकीमुळे प्रदूषण वाढले आहे. ते रोखण्यासाठी यंत्रे बसविण्यात आली. मात्र, ती बंद अवस्थेत आहेत. या सर्व प्रकारामुळे त्रस्त झालेल्या मुल्लाबाग परिसरातील रहिवाशांनी शनिवारी सकाळी आंदोलन केले होते.



### रहिवाशांची मागणी काय?

ठाणे-बोरीवली भुयारी मार्ग मुल्लाबाग येथून रस्ते मार्गे पुढे नेण्यात येणार असून येथील संकुलांच्या प्रवेशद्वाराजवळच पथकर नाका उभारला जाणार आहे. त्यामुळे भुयारी मार्गाच्या प्रकल्पाला आमचा विरोध नाही, पण हा मार्ग रस्ते मार्गे नेण्याऐवजी मुल्लाबाग ते युनी अबेक्स कंपनीपर्यंत भुयारी मार्ग नेण्यात यावा, अशी मागणी रहिवाशांनी केली होती. या संदर्भात रहिवाशांनी एमएमआरडीए अधिकाऱ्यांसोबत चर्चाही केली होती. त्यावेळी याबाबत मुंबई आयआयटीमार्फत अभ्यास करून पाहाणी अहवाल सादर करू असे आश्वासन दिले होते. मात्र, हा अहवाल अद्याप रहिवाशांपुढे सादर करण्यात आलेला नाही.

# सलमान खानला मारण्याची धमकी

## वाहतूक पोलिसांना संदेश; गुन्हा दाखल

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** अभिनेता सलमान खानला पुन्हा धमकी आली आहे. वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला धमकीचा संदेश आला आहे. याप्रकरणी वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक पोलीस व गुन्हे शाखा याप्रकरणी अधिक तपास करत आहे.

वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाच्या व्हॉट्स ॲप क्रमांकावर रविवारी हा धमकीचा संदेश आला होता. त्याबाबतची माहिती वरळी पोलिसांना दिल्यानंतर त्यांनी याप्रकरणी संदेश पाठवणाऱ्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. सलमान खानला घरात घुसून मारणार, तसेच त्याची मोटरगाडी बॉम्बस्फोटात उडवून देण्याची धमकी संदेशात देण्यात आली आहे. वाहतूक पोलिसांनी स्वतः याप्रकरणी वरळी पोलिसांकडे तक्रार केली आहे.

यापूर्वीही सलमानला मारण्याची धमकी मिळाली आहे. वाहतूक पोलिसांच्या व्हाट्सॲप क्रमांकावर धमकी देणारा संदेश आला होता व आरोपीने दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. दोन कोटी रुपये न दिल्यास सलमानला ठार मारण्याची धमकी देण्यात आली होती. याप्रकरणी तत्काळ वरळी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर वरळी पोलिसांनी धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेतला. तेव्हा धमकी देणारी व्यक्ती वांद्रे पश्चिमेकडील जामा मशिदीजवळ असल्याचे कळताच तेथे जाऊन पोलिसांनी आजम मोहम्मद मुस्तफा याला पकडले होते.

### व्हॉट्सॲप ग्रुपवरील चर्चेतून धमकी

अभिनेता सलमान खानला धमकी देणारा तरुण गुजरात वडोदरा येथील रहिवासी असून मयांक पांड्या (२९) असे त्याचे नाव आहे. आरोपीची मानसिक स्थिती ठीक नसल्यामुळे वरळी पोलिसांनी त्याला नोटीस दिली आहे. आरोपीला स्थानिक व्हॉट्सॲप ग्रुपवर सलमान खान व गुंड लॉरेन्स बिष्णोई यांच्या वादाबद्दल माहिती मिळाली होती, तसेच वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला यापूर्वीही धमकी आल्याचे समजले होते. त्यातून त्याने हा प्रकार केल्याचे सांगितले आहे. तरुणाविरोधात यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नाही.

**राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायालय मुंबई बेंच**

**C.P. (CAA)/61/MB/2025**

**संपर्कीत**

**C.A. (CAA)/248/MB/2024**

**कंपनी कायदा, 2013 ("अधिनियम") संदर्भात;**

**आणि**

**कंपनी कायदा, 2013 च्या कलम 230 ते 232 आणि त्याअंतर्गत लागू असलेल्या इतर तरतुदी आणि नियमांच्या संदर्भात, जसे वेळोवेळी लागू होत असतात;**

**आणि**

**ग्लोबल कॉपर प्रायव्हेट लिमिटेड ('GCPL' किंवा 'स्थानांतरण करणारी कंपनी' किंवा 'पहिली अर्जदार कंपनी') आणि राम रत्ना वायर्स लिमिटेड ('RRWL' किंवा 'स्थानांतरण प्राप्त करणारी कंपनी' किंवा 'दुसरी अर्जदार कंपनी') यांच्यातील विलीनीकरणाच्या योजने (अवशोषणाने विलीनीकरण) आणि त्यांच्या संबंधित भागधारकां ('योजना' किंवा 'विलीनीकरण योजना') संदर्भात.**

| | |
|---|---|
| **ग्लोबल कॉपर प्रायव्हेट लिमिटेड** ही कंपनी, कंपनी कायदा, 1956 च्या तरतुदींनुसार स्थापन केली गेलेली आहे आणि तिचं नोंदणीकृत कार्यालय राम रत्ना हाऊस, ओएसिस कॉम्प्लेक्स (युटोपिया सिटी), पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, डिलाईल रोड, मुंबई, महाराष्ट्र – 400 013 येथे आहे. CIN: U27201MH2010PTC433994 | ) पहिली अर्जदार कंपनी / स्थानांतरण करणारी कंपनी |
| **राम रत्ना वायर्स लिमिटेड** ही कंपनी, कंपनी कायदा, 1956 च्या तरतुदींनुसार स्थापन केली गेलेली आहे आणि तिचं नोंदणीकृत कार्यालय राम रत्ना हाऊस, व्हिक्टोरिया मिल कंपाउंड (युटोपिया सिटी), पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई – 400 013 येथे आहे. CIN: L31300MH1992PLC067802 | ) दुसरी अर्जदार कंपनी / स्थानांतरण प्राप्त करणारी कंपनी |

**(पहिली अर्जदार कंपनी आणि दुसरी अर्जदार कंपनी एकत्रितपणे 'अर्जदार कंपन्या' म्हणून ओळखली जातात.)**

**सामूहिक अर्जाची सुनावणीसाठी संयुक्त सूचना**

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 230 ते 232 आणि त्याअंतर्गत लागू असलेल्या इतर तरतुदी आणि नियमांच्या संदर्भात, ग्लोबल कॉपर प्रायव्हेट लिमिटेड ('स्थानांतरण करणारी कंपनी' किंवा 'पहिली अर्जदार कंपनी') आणि राम रत्ना वायर्स लिमिटेड ('स्थानांतरण प्राप्त करणारी कंपनी' किंवा 'दुसरी अर्जदार कंपनी') यांच्यातील विलीनीकरणाच्या योजने (अवशोषणाने विलीनीकरण) आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या विलीनीकरणाच्या संमतीसाठी करण्यात आलेला संयुक्त अर्ज 13 मार्च 2025 रोजी प्रस्तुत करण्यात आलेला होता आणि तो 24 मार्च 2025 रोजी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायालय, मुंबई बेंच (आदरणीय न्यायालय) कडून स्वीकारण्यात आला आणि 2 मे 2025 रोजी सकाळी किंवा त्यानंतर लवकरच अंतिम सुनावणीसाठी निश्चित करण्यात आले आहे.

जो कोणी संयुक्त अर्जाचा समर्थन करायचा किंवा विरोध करायचा इच्छुक असेल, त्याने त्याच्या किंवा त्याच्या वकिलाने स्वाक्षरी केलेली त्याच्या उद्देशाची सूचना संयुक्त अर्जाच्या अंतिम सुनावणीच्या तारखेपासून दोन दिवस आधी खालील पत्त्यावर पाठवावी: 307, राम निमी बिल्डिंग, तिसरा मजला, मांडलिक रोड, न्यूमा रेस्टॉरंटजवळ, ताज महाल पॅलेस हॉटेलच्या मागे, कुलाबा – 400005. विरोधाची कारणे किंवा शपथपत्राची एक प्रति सूचना सोबत सादर केली जाईल. अर्जाची एक प्रति अर्जदार कंपन्यांच्या वकिलाकडून त्या व्यक्तीला प्रदान केली जाईल ज्याला ती आवश्यक असेल, परंतु त्यासाठी नियमानुसार शुल्क भरणे आवश्यक आहे.

दिनांक: 15 एप्रिल 2025

**स्वाक्षरी/-**
हेमंत सेठी
अर्जदार कंपन्यांचे वकील

# ट्रान्सफॉर्मरमध्ये अडकलेल्या हरणाची सुटका

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**ठाणे :** घोडबंदर भागातील कासारवडवली परिसरात असलेल्या एका ट्रान्सफॉर्मर केबिनमध्ये एक हरीण अडकल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेची माहिती मिळताच ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग, वन विभाग आणि वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशनच्या मदतीने हरीणाला सुखरूप बाहेर काढून पुन्हा त्याला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जंगलात सोडण्यात आले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली.

घोडबंदर भागात एका बाजूला खाडी किनारा तर, दुसऱ्या बाजूला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा विस्तीर्ण परिसर आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून हे प्राणी अन्न आणि पाण्याच्या शोधार्थ बाहेर येत असतात. त्यातच, सोमवारी घोडबंदर कासारवडवली भागात एक हरीण आढळून आले. एमबीसी पार्कजवळ एका ट्रान्सफॉर्मर केबिनमध्ये दुपारच्या सुमारास एक हरीण शिरल्याचे समजले. हे हरीण ट्रान्सफॉर्मरमध्ये अडकून बसले होते. याची माहिती पोलीस हवालदार यांनी ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिली. माहिती मिळताच, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी-कर्मचारी, वन विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशनचे स्वयंसेवक घटनास्थळी दाखल झाले. वन विभाग आणि वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशने अथक प्रयत्न करून हरणाला सुखरूप पकडले आणि त्याला बाहेर काढले. बाहेर काढल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर हरणाला राष्ट्रीय उद्यानाच्या जंगलामध्ये मुक्त करण्यात आले, अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली. हे हरीण या ठिकाणी आले कसे, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

